# प्रेसनोट

**अहिल्यानगर**
**दि. ०७/०५/२०२६**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद क्रमांक | जामखेड पो.स्टे. गु.र.नं. 265/2026 |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | दि. 07/05/2026 रोजी 02/56 वा. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 कलम 7(अ), 12 प्रमाणे |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | 1) अभिजीत जालिम भैसडे, वय–39 वर्षे, पद–लिपिक, जन्म मृत्यु नोंदणी विभाग, नगरपरिषद जामखेड, रा. तपनेश्वर गल्ली, मारूती मंदिरासमोर, जामखेड, ता. जामखेड, जि.अहिल्यानगर<br>2) अहमद उर्फ गुड्डु इलियास शेख, वय–43 वर्षे, पद–मदतनीस, अग्निशामक दल, नगरपरिषद जामखेड, (कंत्राटि), रा.काजीगल्ली,मश्जिद समोर, खर्डारोड, जामखेड,ता.जामखेड,जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रू. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३,०००/– रूपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की, तकारदार यांनी दिनांक २६/११/२०२५ रोजी जामखेड नगरपरिषद, जामखेड येथे त्यांचा मुलगा व मुलगी यांचे जन्म दाखला मिळणेकरीता आवश्यक कागदपत्र जोडुन अर्ज दिला होता व मुलांचा जन्म दाखला मिळणेकामी त्यांनी लोकसेवक भैसडे यांची भेट घेतली होती. त्यावेळी लोकसेवक भैसडे यांनी लोकसेवक शेख यांना संपर्क करण्यास सांगितला असता त्याप्रमाणे तकारदार यांनी लोकसेवक भैसडे यांचे सांगणेवरून लोकसेवक शेख यांना संपर्क केला असता लोकसेवक शेख हे तकारदार यांचेकडे दोन्ही मुलांचा जन्मदाखला देण्याकरीता लोकसेवक भैसडे यांचेकरीता प्रत्येक दाखल्याचे १५००/– रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे ३,०००/– रूपये लाचेची मागणी करत असल्याची तकार ला.प्र.वि. कार्यालयात दिनांक ०५/०५/२०२६ रोजी प्राप्त झाली होती.<br><br>तकारदार यांनी दिलेल्या तकारीप्रमाणे दिनांक ०६/०५/२०२६ रोजी लाच मागणी पडताळणी वेळी तकारदार यांनी लोकसेवक अभिजीत भैसडे यांची नगरपरिषद जामखेड येथे भेट घेतली असता लोकसेवक भैसडे यांनी तकारदार यांना लोकसेवक शेख यांची भेट घेण्यास सांगितले असता लोकसेवक भैसडे यांचे सांगणेप्रमाणे तकारदार यांनी लोकसेवक शेख यांची भेट घेतली असता लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मुलाचा व मुलीचा जन्मदाखला देण्याकरीता लोकसेवक भैसडे यांचेसाठी प्रति जन्म दाखल १,५००/– रूपये याप्रमाणे दोन जन्म दाखल्यांचे ३,०००/– रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्शवली व दिनांक ०६/०५/२०२६ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक शेख यांनी जामखेड नगरपरिषद समोर तकारदार यांचेकडुन पंचासमक्ष ३,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारली असुन लोकसेवक शेख यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेल्या लाचरकमेस लोकसेवक भैसडे यांनी समती दर्शवुन लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिलेले आहे |
| सापळा कारवाई | १) पोलीस निरीक्षक श्री. राजु अल्हाट ला.प्र.वि. अहिल्यानगर<br>२) पोकॉ/ ७०९ चंद्रकांत काळे, ३) पोकॉ/ २५७९ किशोर कुळधर,<br>४) पोकॉ/ शेखर वाघ, ५) चा. पोहेकॉ दशरथ लाड |
| तपास अधिकारी | **श्री.अजित त्रिपुटे**, पोलीस उप अधी**क्षक**, ला.प्र.वि., अहिल्यानगर |
| मार्गदर्शन | **१) मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.**<br>२) मा.श्री.माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., नाशिक परिक्षेत्र, नाशिक.<br>४)) पर्यवेक्षण अधिकारी :– पोलीस उप अधी**क्षक श्री.अजित त्रिपुटे–मो.नं.८३२९७०१३४४**) |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत,
टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acb.maharashtra.gov.in

ई–मेल :–spacbnashik@mahapolice.gov.in, 2. dyspacba.nagar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– acb.maharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– **१०६४**

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७ व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००/**९१६८ ६४ १०६४**